लोकमत

# शिवपुतळा परिसराचे सुशोभीकरण सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील शिवपुतळा परिसराच्या सुशोभीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यातील काम सुरू झाले आहे. त्यामध्ये विद्युत रोषणाई, दगडी संरक्षक भिंत, लँडस्केप गार्डन, आदी कामे केली जाणार आहेत.

या सुशोभीकरणातील कामाचा पहिला टप्पा गेल्यावर्षी पूर्ण झाला आहे. त्यात बगीच्याच्या चार बाजूंनी पुतळ्यापर्यंतच्या मार्गाचे रुंदीकरण करण्यात आले आहे. या मार्गाच्या बाजूला नक्षीकाम केलेले घडीव दगड लावण्यात आले आहेत. सध्या सुशोभीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यातील काम सुरू झाले आहे. त्यामध्ये बगीच्याच्या बेसाल्ट खडकाचे रेलिंग होणार आहे. त्यासह उद्यानामध्ये स्प्रिंकलर बसविला जाणार आहे. विद्युत रोषणाई केली जाईल. लँडस्केप गार्डनअंतर्गत याठिकाणी विविध रंगांची फुले असणारी आकर्षक फुलेझाडे लावण्यात येणार आहेत. जूनपूर्वी सुशोभीकरणाचे काम पूर्ण करण्याचे ध्येय आहे. अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मंगळवारी दिली.



शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील शिवपुतळा परिसराच्या सुशोभीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यातील काम सुरू झाले आहे.

Kolhapur Main
Page No. 5 Apr 28, 2021
Powered by: erelego.com

# कोल्हापुरात व्हेंटिलेटर बेड फुल्ल

## काही दिवसांत शहरात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता

कोल्हापूर : सतीश सरीकर

**कोल्हापूर शहरात जिल्ह्यासह परजिल्हा व परराज्यातून कोरोना रुग्ण उपचारासाठी येत आहेत. परिणामी, शहरातील व्हेंटिलेटर बेड फुल्ल झाले आहेत. सीपीआर, महापालिकेसह खासगी हॉस्पिटलमध्ये तब्बल २४१ व्हेंटिलेटर बेड असून त्यापैकी खासगी हॉस्पिटलमध्ये फक्त ३ बेड शिल्लक आहेत. मंगळवारी रात्रीत तेही बेड रुग्णांसाठी वापरावे लागतील. परिणामी, कोल्हापुरात व्हेंटिलेटरचे बेड फुल्ल झाले आहेत. रोजच्या कोरोना रुग्णांची अशीच स्थिती राहिल्यास येत्या काही दिवसांत कोल्हापूर शहरात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.**



कोल्हापूर शहरातील ६२ खासगी हॉस्पिटलमध्ये कोव्हिड रुग्णावर उपचारासाठी परवानगी दिली आहे. या हॉस्पिटलमध्ये १७४४ इतके बेड आहेत. खासगी हॉस्पिटलमधील ऑक्सिजन बेड फुल्ल झाल्यानंतर हॉटेलमध्ये रुग्ण ठेवून त्यांच्यावर उपचार करण्यासाठी परवानगी दिली जाईल. गेल्या वर्षी अशाप्रकारे लक्षणे रुग्ण नसलेले हॉटेलमध्ये ठेवून खासगी वैद्यकीय स्टाफद्वारे उपचारासाठी मंजुरी देण्यात आली होती. यंदाही त्या पद्धतीनेच हॉटेलही कोव्हिड रुग्णांसाठी राखीव ठेवण्याची कार्यवाही होण्याची शक्यता आहे.

### कोल्हापुरातील खासगी हॉस्पिटलमधील स्थिती

| | एकूण बेड | रुग्णसंख्या | उपलब्ध बेड |
|---|---|---|---|
| नॉनऑक्सिजन बेड | ५५५ | ३६४ | १९१ |
| ऑक्सिजन बेड | ८९२ | ६८८ | २०४ |
| आयसीयू बेड | २९७ | २२९ | ६८ |
| व्हेंटिलेटर बेड | १३२ | १२९ | ३ |
| एकूण बेड संख्या | १७४४ | १२८१ | ४६३ |

### तीन हजार बेडची तयारी, पण व्हेंटिलेटर नगण्य...

सरकारी, महापालिकेचे हॉस्पिटल रुग्णांनी फुल्ल झाल्यानंतर महापालिकेच्या वतीने कोव्हिड केअर सेंटर सुरू करण्यात येत आहेत. सुरुवातीला तब्बल ३५० बेड असलेले शिवाजी विद्यापीठातील डीओटी केंद्र सुरू केले आहे. विद्यापीठातील होस्टेलमध्ये ५०० बेड तयार केले आहेत. आणखी कोव्हिड केअर सेंटरची तयारी महापालिकेने केली आहे. तसेच खासगी कोव्हिड केअर सेंटरलाही मंजुरी देण्यात येत आहे. अशाप्रकारे महापालिकेने शहरात सुमारे तीन हजारांवर बेडची तयारी केली आहे. यात व्हेंटिलेटर बेडची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी आहे.

### व्हेंटिलेटर बेडची संख्या...

- **सीपीआर - १०३ - सर्व फुल्ल**
- **खासगी हॉस्पिटल - १३२ शिल्लक ३**
- **महापालिका - ६ - सर्व फुल्ल**

### व्हेंटिलेटरवर परजिल्ह्यांतील ५० टक्के रुग्ण

कोल्हापूर शहरात जिल्ह्यासह परजिल्हा व परराज्यातील अनेक कोरोना रुग्णांवर उपचार सुरू आहेत. यातील बहुतांश रुग्ण सीपीआर व खासगी हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजनवर आहेत. त्याबरोबरच शहरातील एकूण व्हेंटिलेटरवरील रुग्णांपैकी ५० टक्के रुग्ण परजिल्हा व परराज्यातील आहेत. संबंधित बेडवरील रुग्ण बरे झाल्यास इतरांना बेड मिळणार आहेत. अन्यथा बुधवारपासून कोल्हापुरात कितीही अत्यवस्थ रुग्ण असला, तरी त्यांच्यासाठी व्हेंटिलेटरचा बेड उपलब्ध नसेल.

सकाळ

# विद्यापीठ कर्मचाऱ्यांसाठी कोविड सेंटरची मागणी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कर्मचारी कोरोना काळातही विद्यापीठात येऊन काम करत आहेत. अशा काळात त्यांच्या व कुटुंबीयांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विद्यापीठाने स्वतंत्र कोविड सेंटर सुरू करावे, अशी मागणी अधिसभा सदस्य महेश निलजे आणि पंकज मेहता यांनी केली आहे. याबाबतचे पत्र त्यांनी विद्यापीठ प्रशासनाला दिले आहे. पत्रातील माहितीनुसार, विद्यापीठाची वसतिगृहे प्रशासनाने ताब्यात घेऊन तेथे कोविड सेंटर सुरू केले आहे. विद्यापीठात १५ टक्के कर्मचाऱ्यांची उपस्थिती आहे. कोविड काळात सेवा बजावणाऱ्यांना व कुटुंबीयांना स्वतंत्र कोविड सेंटर असावे. जेणे करून त्यांना उपचारासाठी धावाधाव करावी लागणार नाही.

## विद्यापीठ शिक्षणशास्त्र अधिविभागास १.२० कोटींचे अर्थसहाय्य

# विद्यार्थी, शिक्षक, प्रशिक्षकांना मिळणार आधुनिक कौशल्य शिक्षण!

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



डॉ. प्रतिभा पाटणकर

युरोपियन युनियनच्या 'इरॅस्मस प्लस' या आंतरराष्ट्रीय प्रकल्पांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागाला १ कोटी २० लाख रुपयांचे अर्थसाह्य प्राप्त झाले आहे. याच्या माध्यमातून शालेय विद्यार्थी, शिक्षक व प्रशिक्षणांना २१ व्या शतकातील कौशल्याचे शिक्षण मिळणार आहे.

शिक्षणशास्त्र अधिविभाग युरोपियन युनियनच्या 'इरॅस्मस प्लस' अर्थसहाय्यित प्रकल्पामध्ये काम करीत आहे. 'समिटिगेट द इम्पॅक्ट ऑफ इंडस्ट्रियल रिव्हॉल्युशन ऑन इंडियन सोसायटी : एज्युकेशन रिफॉर्म फॉर फ्युचर अँड इन सर्व्हिस स्कूल टीचर्स' हे प्रकल्पाचे शीर्षक आहे. पंजाबमधील चित्कारा विद्यापीठ प्रकल्पाचे मुख्य समन्वयक आहे. यामध्ये शिक्षणशास्त्र विभागासह इटली, लेविटिया, फिनलंड, जर्मनीतील विद्यापीठे व स्कूल भागीदार आहेत.

विद्यार्थी, शिक्षक, प्रशिक्षक व सेवांतर्गत शिक्षकांमध्ये नव्या शतकातील कौशल्ये विकसित करणे हा प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक, पृथक्करण व सृजनशील विचार कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रशिक्षकांना तयार करणे व त्यासाठी विविध अध्यापनशास्त्रीय पद्धती, साधने व तंत्रे यांचा युरोपियन व भारतीय सहकाऱ्यांच्या सहाय्याने शोध घेण्यात येणार आहे. नव्याने शोध घेतलेल्या अध्यापनशास्त्रीय पद्धतीचे भारतीय सामाजिक परिस्थितीत समायोजन व समावेशन होण्यासाठी शिक्षण प्रशिक्षणाच्या पदवी, पदव्युत्तर व पीएच.डी. स्तरावरील अभ्यासक्रमात

**पान २ वर ▶**

लोकमत

# ‘शिक्षणशास्त्र’ करणार कौशल्य विकास

## प्रकल्पाला १ कोटी २० लाखांचे अर्थसाहाय्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** युरोपियन युनियनच्या ‘इरॅस्मस प्लस’ या आंतरराष्ट्रीय प्रकल्पांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागाला १ कोटी २० लाख रुपयांचे अर्थसाहाय्य प्राप्त झाले आहे, अशी माहिती प्रकल्प समन्वयक डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी मंगळवारी दिली.

या प्रकल्पाचे मुख्य समन्वयक पंजाबमधील चित्कारा विद्यापीठ आहे. यामध्ये शिक्षणशास्त्र विभागासह इटली, लेविटिया, फिनलँड, जर्मनीमधील विद्यापीठे व स्कूल भागीदार आहेत. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश विद्यार्थी, शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक व सेवांतर्गत शिक्षकांमध्ये २१ शतकातील कौशल्ये विकसित करणे हा आहे. त्यात शालेय विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक, पृथक्करण, सृजनशील विचारकौशल्ये विकासासाठी प्रशिक्षकांना तयार करणे, त्यासाठी विविध अध्यापनशास्त्रीय पद्धती, साधने, तंत्रे यांचा युरोपियन, भारतीय सहकाऱ्यांच्या साहाय्याने शोध घेणे, नव्याने शोधलेल्या अध्यापनशास्त्रीय पद्धतीचे भारतीय सामाजिक परिस्थितीमध्ये समायोजन व समावेशन केले जाणार आहे.

या प्रकल्पासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांचे मार्गदर्शन लाभत आहे, असे डॉ. पाटणकर यांनी सांगितले.



### विद्यार्थी, शिक्षकांना सुसज्ज करणे

- पदवी, पदव्युत्तर शिक्षण कार्यक्रमांमध्ये सुधारणा व नवीन पद्धतींचा समावेश करण्यासाठी कॅस्केड प्रतिमानाचा वापर करून ज्ञान, कौशल्ये शालेय विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक, प्रशिक्षक व सेवांतर्गत शिक्षक यांना सुसज्ज करणे, त्याप्रमाणे राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद यांचा सल्ला घेणे, मार्गदर्शन करणे या बाबींचा अवलंब करण्यात येणार आहे.
- हा प्रकल्प तीन वर्षांमध्ये पूर्ण करण्यात येईल. या प्रकल्पाच्या माध्यमातून शिक्षणशास्त्र अधिविभाग आंतरराष्ट्रीय स्तरावरील काम करणार असल्याची माहिती डॉ. पाटणकर यांनी दिली.

# विद्यार्थी, शिक्षक, प्रशिक्षकांना मिळणार आधुनिक कौशल्य शिक्षण!

(पान १ वरून) समावेश करणे व त्यानुसार त्यांना शिक्षण दिले जाणार आहे. प्रकल्पाचा उद्देश साध्य होण्यासाठी भारत व निवडक युरोपियन देशांमध्ये शिबिरे घेण्यात येणार आहेत. प्रकल्पासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे, असे प्रकल्प समन्वयक डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी सांगितले. भारतामधील पदवी व पदव्युत्तर शिक्षण कार्यक्रमात सुधारणा व नवीन पद्धतींचा समावेश करण्यासाठी कॅस्केड प्रतिमानाचा वापर करून २१ शतकातील ज्ञान व कौशल्ये शालेय विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक, प्रशिक्षक व सेवांतर्गत शिक्षक यांना सज्ज करण्यात येणार आहे. हा प्रकल्प तीन वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहे. यातून प्राप्त होणाऱ्या आर्थिक सहाय्याद्वारे विभाग शैक्षणिकदृष्ट्या अधिक सुसज्ज व सक्षम केला जाणार असल्याचे डॉ. पाटणकर यांनी सांगितले.

लोकमत

# पोलिसांकरिता शिवाजी विद्यापीठात कोविड सेंटर

## पोलिसांच्या कुटुंबियांचीही सोय : १०० बेडची व्यवस्था

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबियांसाठी सोमवारपासून शिवाजी विद्यापीठ येथे १०० बेडचे कोविड सेंटर सुरू करण्यात आले आहे. त्यामध्ये २० ऑक्सिजन बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी विशेष प्रयत्न करून हे कोविड सेंटर सुरु केले.

या कोविड सेंटरमध्ये ग्रामीण भागातून कोरोनाबाधित अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांना आणण्यासाठी रुग्णवाहिकेची



व्यवस्था केलेली आहे. रुग्णांसाठी लागणारी औषधे, पौष्टिक आहाराचीही सोय करण्यात आली आहे. कोविड सेंटरमध्ये सर्व सुविधा मोफत देण्यात येणार आहेत. दैनंदिन लक्ष देण्यासाठी पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना तात्काळ मदत मिळण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयात विशेष कक्ष स्थापन केला आहे. पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. कोरोनाबाधित पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींची प्रकृती बिघडल्यास त्यांना तात्काळ उपचार उपलब्ध होण्यासाठी खास व्यवस्था केली आहे.

तसेच पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी प्रत्येक पोलीस अधिकारी व अमलदार यांना १०० एम.एल.च्या हँड सॅनिटायझर बॉटल्स दिल्या असून, एन -९५ चे मास्क, फेस शिल्ड पुरविले आहेत.

# ऑनलाईन परीक्षेला १९ हजार विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परीक्षेंतर्गत मंगळवारी झालेल्या ऑनलाईन परीक्षेला २० हजार ३४२ पैकी १९ हजार ९१४ विद्यार्थी बसले. विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बी.एस्सी.-बायोटेक, बी.एस्सी.-आयटी, बी.एस्सी.-शुगरटेक, बीसीए, बीबीए, बीएसडब्ल्यू.,बीआयडी, बीएफटीएफ, बी.एस्सी., एम.कॉम.,एमसीए, बीए., बी.एस्सी., एम.एस्सी. अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या.

लोकमत

# विद्यापीठ शिक्षक, कर्मचाऱ्यांसाठी कोविड सेंटर उभारावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांसाठी प्रशासनाने कोविड सेंटरची उभारणी करावी, अशी मागणी अधिसभा सदस्य पंकज मेहता, महेश निलजे आणि महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाने मंगळवारी केली आहे. त्याबाबतचे निवेदन त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांना दिले.

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे त्यातच विद्यापीठातील दोन कर्मचाऱ्यांचे कोरोनाने निधन झाले काहीजण उपचार घेत आहेत त्यांच्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांमधील आणि विद्यापीठाच्या विविध अधिविभागांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि अधिकारी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीची प्रकृती गंभीर झाल्यास त्यांना योग्य ते उपचार आणि सोयीसुविधा मिळणे आवश्यक आहे. ते लक्षात घेऊन विद्यापीठ प्रशासनाने कोविड सेंटरची उभारणी करावी, अशी मागणी केली आहे.

Hello Kolhapur
Page No. 4 Apr 28, 2021
Powered by: erelego.com